| | | |
|---|---|---|
| १ | जलप्रदाय विभागाची रचना कार्य व कर्तव्य यांचा तपशील | जलप्रदाय विभागाची स्थापना नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८ चे कलम ५७ महानगरपालिकेची आवश्यक व स्वेच्दाधिन कर्तव्य अंतर्गत उपकलम K अन्वये शहरातील पाणीपुरवठा प्रणालीचे व्यवस्थापन करण्यास करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या सर्व पाणीपुरवठा केंद्राची व्यवस्था हि सुस्थितीत ठेवणे आणि सार्वजनिक व खाजगी प्रयोजनासाठी पुरेसा पाणी पुरवठा करण्यासाठी आवश्यक अशी नवीन बांधकामे बांधणे किंवा नवीन संपादन करणे, पाणी पुरवठा करणे, पाणीपट्टी वसुल करणे, ग्राहक तक्रार निवारण इत्यादी जलप्रदाय विभागाची कामे कर्तव्य आहे. १ मार्च २०१२ पासून हि कामे पार पाडण्याकरीता आरेंज सिटी वॉटर प्रा. लि. या कंपनीला ऑपेटर म्हणून नियुक्त करण्यात आले असुन त्यांच्या मार्फत हि सर्व कामे व कर्तव्ये जलप्रदाय विभागाचे नियंत्रणात करवून घेण्यात येत आहे. |